/

## श्री. विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर

यांचे कार्यालय जिल्हा सोलापूर-- ४१३३०४

(महाराष्ट्र शासन स्थापित)

## लाडू प्रसादासाठी खाद्यरंग पुरवठा करणेकामी सहभागी होणेसाठी अर्ज

दिनांक - /०३/२०२६

प्रति,

मा. कार्यकारी अधिकारी,
श्री.विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती,
पंढरपूर, जि.सोलापूर.

विषयः- लाडू प्रसादासाठी खाद्यरंग खरेदी करणेकामी दरपत्रक मागविणेबाबत

अर्जदाराचे पूर्ण नावः- ----------------------------------------------------------------

पूर्ण पत्ताः- ----------------------------------------------------------------

----------------------------------------------------------------

मोबाईल क्रं.:- ----------------------------------------------------------------

महोदय,

वरील विषयात नमूद केले प्रमाणे विनंती अर्ज करतो की, आपलेकडील दिनांक -----/----/२०२६ रोजीचे वर्तमानपत्रातील मंदिर समितीच्या लाडू विभागाकडील खाद्यरंग खरेदी करणेकामी दर पत्रक मागविणेसाठी दिलेली जाहिरात वाचली असून मला सदर खाद्यरंग पुरवठा करणे मध्ये सहभाग घेण्याची इच्छा आहे. त्यासाठी अनामत रक्कम रू.५,०००/- रोखीने / डी.डी. ने भरलेली आहे. सदरच्या खरेदी प्रक्रीयेमधील मंदिरे समितीच्या सर्व अटी, शर्ती व सूचना (वेबसाईट वरील आणि अर्जासोबत दिलेल्या) मला मान्य आहेत व त्याचे मी तंतोतंत पालन करीन.

१) फॉर्म फी व अनामत रक्कम डिमांड ड्राफ्टने दिली असल्यास बँकेचे नांव, डी.डी. क्रमांक व दिनांक (सोबत डि.डि. जोडला आहे.)

----------------------------------------------------------------

२) फॉर्म फी व अनामत रक्कम रोख भरली असल्यास पावती क्रमांक व दिनांक (सोबत पावतीची झेरॉक्स प्रत जोडली आहे.)

----------------------------------------------------------------

३) सोबत ओळखीचा पूरावा म्हणून ------------------------------------चे झेरॉक्स प्रत जोडली आहे.

४) सोबत रहिवासाचा पूरावा म्हणून ------------------------------------ची झेरॉक्स प्रत जोडली आहे.

आपला विश्वासू,
(नाव व सही)

अटी व शर्ती

१ सदर कायदिश दिल्यानंतर खाद्यरंग पुरवठा आपणास विहीत दिलेल्या मुदतीत उपलब्ध करणे बंधनकारक राहील.

२ खाद्यरंगाचा दर्जा उत्तम व चांगला असावा पुरवठा करण्यात आलेल्या खाद्यरंगाचा दर्जा योग्य असल्याची खात्री झाल्यावरच देयक अदा करण्यात येईल. खाद्यरंग पुरवठा करण्यापूर्वी आगाउ रक्कम दिली जाणार नाही.

३ खराब खाद्यरंग स्विकारला जाणार नाही. खराब असलेला खाद्यरंग बदलून देणे आपणावर बंधनकारक राहील. त्या अनुषंगाने वाहतूकीचा वेगळा खर्च मंदिर समिती कडून अदा करण्यात येणार नाही.

४ मान्य दरामध्ये काणत्याही कारणास्तव भाववाढ दिली जाणार नाही /मागता येणार नाही.

५ बिलामध्ये मूळ दर व अतिरिक्त कर दराचा उल्लेख करावा. प्रचलित अधिनियम/नियमातील तरतुदीनुसार आवश्यक ती कर कपात करण्यात येईल.

६ पुरवठा करण्यात आलेला खाद्यरंग दर्जाहीन असल्याने आढळून आल्यास या संदर्भात समर्पक खुलासा न केल्यास सदरील काम आपणाकडून काढून घेण्यात येईल याची दखल घ्यावी.

७ कामाच्या दर्जाबाबत त्रुटी आढळल्यास किंवा विलंब झाल्यास अशा प्रकरणी मंदिर समितीचा निर्णय अंतिम राहील.

८ सदर खाद्यरंग पुरवठा आदेश प्राप्त झाल्यापासून ७ दिवसात पुरवठा करण्याची जबाबदारी आपली राहील. पुरवठा वेळेत न केल्यास किंवा खराब पुरवठा केल्यास तुमच्या देयकातून २०% रक्कम कपात करण्यात येईल. पुरवठाचे काम पुर्ण केल्यावर न्यासास देयक सादर करताना देयकामध्ये पॅन कार्ड/जा एस टी क्रमांक व कंपनीच्या बॅकेचा तपशील नमूद करणे.

९ सदर कायदिशानुसार आपणास दि..../..../२०२७ पर्यंत खाद्यरंग पुरवठा करावयाचा आहे. मात्र काही तांत्रिक कारणास्तव पुढील वर्षासाठी यासंदर्भातील प्रक्रिया विहीत वेळेत पूर्ण न झाल्यास आपणास दि.. .../...../२०२८ नंतर पुढील वर्षासाठीचे कार्यादेश देउन त्यानुसार खाद्यरंग उपलब्ध होईपर्यंत पुरवठा करणे बंधनकारक राहील.

१० उपरोक्त अटी व शर्तीमध्ये काही बदल, सुधारणा करण्याचा वा जादा अटी वा शर्ती विहीत करण्याचा अधिकार मंदिर समितीने राखून ठेवला आहे. आपली कोणतीही अट/अटीनुसार बंधनकारक राहणार नाही.

११ नमुना अर्ज कार्यालयीन वेळेत श्री. तुकाराम भवन, पंढरपूर व एमटीडीसी भक्तनिवास, पंढरपूर येथे उपलब्ध होवून मिळतील. तसेच www.vitthalrukminimandir.org या वेबसाईटवर मिळतील.

१२ फॉर्म भरून दि.०७/०४/२०२६ सायं. ०५.००वा. पर्यंत श्री. तुकाराम भवन, पंढरपूर येथे दाखल करणे आवश्यक आहे. अर्ज समक्ष तुकाराम भवन येथे सादर करावेत किंवा रजिस्टर पोस्टाने पाठवावे. उशीरा आलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.

१३ अर्ज, फॉर्म फी व अनामत रकमेचा डि.डी. /रोखीची पावती सिलबंद पाकिटात दि.०७ /०४/२०२६ रोजी सांय.०५.०० वाजेपर्यंत सादर करणे आवश्यक राहील. सिलबंद पाकिटावर ठेकेदाराचे पूर्ण नाव, पत्ता, मोबाईल क्र. व खाद्यरंग पुरवठा असे नमूद करणे आवश्यक आहे. अर्ज दि. ०८ /०४/२०२६ रोजी दु.१२.०० वा. एमटीडीसी भक्तनिवास, पंढरपूर येथे सर्व ठेकेदारांच्या समक्ष उघडण्यात येतील. ज्या ठेकेदाराने कमीत कमी दर नमुद केला असेल त्यांचे दर पत्रक मंजुर करण्यात येईल.

१४ कोणताही अर्ज अगर सर्वच अर्ज कोणतेही कारण न दर्शविता नाकारणे किंवा स्विकारणे अथवा स्थगित ठेवणे किंवा रद्द करणे याबाबतचे संपूर्ण अधिकार मंदिर समितीने राखून ठेवले आहेत.

१५ नमुन्यातील अर्जासोबत ओळखीचा पूरावा म्हणून निवडणूक ओळखपत्र/आधारकार्ड/ड्रायव्हींग लायसंन्स/राष्ट्रीय बॅकेचे पासबुक/पॅनकार्ड यापैकी एकाची झेरॉक्स प्रत जोडणे आवश्यक आहे. तसेच अर्ज उघडण्याचे वेळी मुळ ओळखपत्र आणणे आवश्यक आहे.

१६ रहिवासी पुराव्यासाठी स्वत:चे नावाचे लाईट बील किंवा फोन बीलाची एक प्रत अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.

१७ अर्ज मंजुर झाल्यानंतर ७ दिवसांचे आत करारनामा करुन देण्यासाठी रु.१००/- चा गैरन्यायीक स्टॅम्पपेपर जमा करावा, परंतू अशाप्रकारे करारनामा करुन दिला नाही, अथवा त्याबद्दल टाळाटाळ केल्यास कार्यादेश रद्द करणेत येईल.

१८ सदर कामासंबंधी काही वाद उद्भल्यास त्यासाठी न्यायालयीन कार्यक्षेत्र पंढरपूर हे राहील.

१९ फॉर्म फी रू.५००/- व अनामत रक्कम रू.५,०००/- चा कार्यकारी अधिकारी, श्री. विठ्ठल रूक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर यांच्या नावाचा डी.डी. किंवा रोखीने रक्कम जमा केल्याची पावती सादर करणे आवश्यक आहे.

व्यवस्थापक
श्री.विठठल रुक्मिणी मंदिरे समिती
पंढरपूर